




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०६ एप्रिल २०२५







## दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अहवालाला महत्त्व नाही : चाकणकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** काही दिवसांपूर्वी पुण्यात एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला होता. यानंतर पीडित महिलेल्या कुटुंबीयांनी पैशाअभावी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पीडितेला रुग्णालयात दाखल करून घेतले नाही असा आरोप केला आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर राज्यभरातून याबाबत संताप व्यक्त होत आहे. याचबरोबर मंगेशकर रुग्णालयाला टीकेचा समाना करावा लागत आहे. अशात रुग्णालय व्यवस्थापनाने या प्रकरणाची त्यांच्या अंतर्गत चौकशी समितीद्वारे चौकशी करून त्याचा अहवाल जाहीर केला होता.

दरम्यान दीनानात मंगेशकर रुग्णालयाच्या अंतर्गत चौकशी समितीच्या अहवालात, पीडित महिलेने वेळेवर उपचार घेतले नाहीत, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी पैशांची अट ठेवली नव्हती आणि प्रसूतीतील गुंतागुंतीमुळे पीडितेला मुल दत्तक घेण्याचा सल्ला दिल्याचे दावे करण्यात आले होते. अशात रुग्णालयाच्या अहवालावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी मोठी प्रतिक्रिया दिली आहे.



**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई होणार, आरोग्यमंत्र्यांचं आश्वासन**

पुण्यातील घटना मनाला सुन्न करणारी आहे. घटनेची पूर्ण चौकशी करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. त्यातून येणाऱ्या अहवालानुसार संबंधित रुग्णालयावर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल. मंगेशकर रुग्णालयाची नोंदणी ट्रस्ट कायद्यांतर्गत केली आहे. शासनाच्या सर्व सुविधांचा लाभ अशा रुग्णालयांना मिळत असतो. त्यामुळे अशी पैशांची मागणी संबंधित रुग्णालयाला करता येऊ शकते का? याचीही चौकशी होईल

**– आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर**

**स्वत:लाच क्लिन चिट देण्याचा प्रयत्न...**

रुपाली चाकणकर यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या चौकशी समितीचा अहवाल म्हणजे, स्वत:लाच क्लिन चिट देण्याचा प्रयत्न, त्याला महत्त्व नाही, असे म्हटले आहे.

या प्रकरणाबाबत माध्यमांशी बोलताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या की, या प्रकरणातील पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीच्या अधारे संपूर्ण चौकशी केली जाणार आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने स्वत:चाच एक चौकशी अहवाल सादर केला आहे. पण, त्याला काही इतके महत्त्व आणि गांभीर्य नाही. कारण हा स्वत:लाच क्लिन चिट देण्याचा प्रकार या रुग्णालयाच्या माध्यमातून केला जात आहे. मात्र, राज्य सरकारची जी चौकशी समिती आहे तिचा अहवाल सोमवारी सकाळी पुणे पोलीस आयुक्तांच्या समोर सादर केला जाणार आहे.

**रुग्णालयाच्या अहवालात काय?**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अंतर्गत चौकशी समितीच्या अहवालामध्ये तनिषा भिसे २०२० पासून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार घेत होत्या असे म्हटले आहे. याचबरोबर भिसे यांच्यावर २०२२ साली एक शस्त्रक्रियाही झाली असून त्यामध्ये त्यांना खर्चाच्या ५० टक्के रकमेची सूट देण्यात आल्याचेही अहवालात म्हटले आहे. दरम्यान या चौकशी समितीच्या अहवालात असेही म्हटले आहे की, या पीडित महिलेची सुखरूप प्रसुती होण्याची शक्यता नसल्याने रुग्णालयाने त्यांना मूल दत्तक घेण्याचा सल्ला दिला होता.

## थोडक्यात

### वाघाच्या हल्ल्यात युवा शेतकरी ठार !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, चंद्रपूर :** शेतातील भाजीपाला पिकाला पाणी देण्यासाठी गेलेल्या युवा शेतकऱ्यावर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना चंद्रपूर जिल्ह्यातील मुल तालुक्यातील चितेगाव येथे शनिवारी सकाळी घडली. मृत शेतकऱ्याचे नाव शेषराज पांडूरंग नागोशे (३८) असे आहे. सकाळी शेतात पीकाची पाहणी करण्यासाठी आणि पाणी देण्यासाठी गेले असता दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला करून जागीच ठार केले. शेतातील मोटार पंपाजवळच वाघाने हल्ला करून शेषराजला नदीकाठावरील परिसरात ओढत नेले. यावेळी शेषराजचे वडील सुद्धा शेतावर होते. ही घटना परिसरातील शेतकऱ्यांना माहिती होताच त्यांनी गावात येवून गावकऱ्यांना माहिती दिली. तसेच सावली वनविभागाला कळविण्यात आले. या घटनेने चितेगाव येथे खळबळ उडाली आहे. शेषराव नागोशे यास आई वडील, पत्नी आणि दोन मुली आहे. मूल तालुक्यातील वाघाच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकरी, शेतमजूर आणि गुराख्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. गुरूवारी चितेगाव येथे वाघाने एक गाय आणि एक गोऱ्याला गावात येऊन ठार केले होते. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी चितेगाव येथे वाघाने शेतकऱ्यावर शेतात हल्ला केला. नरभक्षी वाघाचा बंदोबस्त करावा अशी जोर धरत आहे. चितेगाव येथिल शेषराज पांडूरंग नागोशे यांची उमा नदीच्या परिसरात असलेल्या आपल्या शेतात उन्हाळी भाजीपाला पीकाची लागवड केली आहे. या परिसरात नदीकाठावर बऱ्याच शेतकऱ्यांनी डबल फसल लावली आहे. या घटनेने शेतकरी, शेतमजूर आणि गुराख्या मध्ये दहशत निर्माण झाली आहे. वाघाच्या वाढत्या हल्लयांमुळे तालुक्यात चिंतेचे वातावरण आहे. तालुक्यातील आकापूर, मरेगाव, एमआयडीसी परिसर आणि चितेगाव या भागात वाघाच्या हल्ले होत असल्याने वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे. वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला. शेषराज हा आपल्या शेतातील भाजीपाला ठोक दराने विक्री करीत होता. या घटनेने नागोशे कुटुंबीयांवर मोठा आघात बसला आहे.

### ५०० एकर जमीनीवर बिबट्यांसाठी संरक्षित क्षेत्र उभारणार
### केंद्रीय वन मंत्री भुपेंद्र यादव यांची खा.नीलेश लंके यांना ग्वाही



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** शासनाच्या ५०० एकर जमिनीवर तटबंदी करून बिबटयांसाठी संरक्षित क्षेत्र उभे केले जाईल. मानवी वस्त्यांमध्ये आढळणारे बिबटे त्या क्षेत्रात सोडण्यात येतील अशी ग्वाही मंत्री यादव यांनी खा. लंके यांना दिली. अहिल्यानगर जिल्ह्यातील बिबट्यांची वाढती संख्या व माणसांवर होणारे वारंवार हल्ले यावर उपाययोजना करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय वन मंत्री भुपेंद्र यादव यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी संरक्षीत क्षेत्र उभारण्याची ग्वाही दिली. खा. लंके यांनी शुक्रवारी यादव यांची भेट घेतली. यावेळी खा. लंके यांनी मंत्री यादव यांना निवेदन सादर केले. त्यात नमुद करण्यात आले आहे की, सहयाद्री पर्वत रांगेत तसेच महाराष्ट्राच्या अन्य पठारी व पर्वतीय भागांत बिबट्यांची संख्या झपाटयाने वाढत असून ते नरभक्षक होत आहेत. त्यातून वन्यजीव व मनुष्यामध्ये संघर्ष होत आहे. वन्य प्राण्यांकडून शेतामध्ये काम करणारे शेतकरी तसेच जंगल क्षेत्रात राहणारे आदीवासी यांना मारण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघात उस शेतीचे क्षेत्र अधिक आहे. उस क्षेत्र बिबट्यांना लपण्यासाठी तसेच प्रजणनासाठी सुरक्षित आहे. त्यातून बिबट्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यासाठी बिबटयांची नसबंदी करण्यासंदर्भातील योजना राबवावी. त्यामाध्यमातून बिबट्यांची संख्या नियंत्रीत ठेवण्यास मदत होउन मानव व वन्यजीवांमधील संघर्ष कमी होउ शकेल, जीवन आणि मालमत्तेचे नुकसान होणार नाही असा विश्वास खा. लंके यांनी या निवेदनात व्यक्त केला आहे.

## सरकार रुग्णालय ताब्यात घेणार का? आदित्य ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती महिला मृत्यू प्रकरणी राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. एका गर्भवती महिलेवर उपचार करण्यासाठी १० लाखांची अनामत रक्कम मागितल्याचा आरोप दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनावर करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेतील गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणावरून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर टीकेची झोड उठली आहे.

आता या घटनेबाबत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत संताप व्यक्त केला आहे. तसेच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर राज्य सरकार काही कारवाई करणार आहे की नाही? राज्य सरकार हे रुग्णालय ताब्यात घेणार का? असे सवाल विचारत आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.


**आदित्य ठाकरे काय म्हणाले?**

गेल्या दोन दिवसांपासून आंदोलन सुरु आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दुर्देवी घटना घडली. पण त्या कुटुंबाला न्याय मिळायला हवा. मला या घटनेत कोणतंही राजकारण आणायचं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जर त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकत नसतील तर सर्वसामान्य माणसांनी काय करायचं?, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारला आहे.

पुण्यातील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने १० लाख रुपयांची मागणी केली होती. मग दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाला राज्य सरकार काही जाब विचारणार आहे की नाही? जर मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाला किमान ५ फोन केले होते अशी माहिती सांगितली जाते. मग जर मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून रुग्णालय प्रशासनाला फोन जाऊन देखील ते दखल घेत नसतील तर त्या रुग्णालय प्रशासनाची ही मस्ती, मुजोरी सरकार उतरवणार आहे की नाही?, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाला एवढी मस्ती का आहे? या रुग्णालयात ज्या काही गोष्टी आहेत, त्या सुधारण्यासाठी राज्य सरकार समोर येणार आहे की नाही? किंवा दीनानाथ मंगेशकर रुग्णालय सरकार ताब्यात घेणार का? तसेच या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचं महानगरपालिकेला किंवा आयकर विभागाला काही देणं आहे का? आता हे देखील तपासणं गरजेचं आहे, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

पुण्यातील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणानंतर भाजपाच्या काही महिला कार्यकर्त्यांनी एका क्लिनीकची तोडफोड केली. मग भाजपाच्या राज्यात भाजपाच्याच कार्यकर्त्यांना असुरक्षित असल्याचं वाटतंय का? भाजपाच्याच कार्यकर्त्यांना न्याय मिळताना दिसत नाही. पण तरीही अशा घटनांवर मुख्यमंत्री गप्प आहेत. ही महिला भाजपाच्या एका आमदारांच्या पीएची पत्नी होती. ती महिला उपचाराची मागणी करत होती. पण उपचार मिळाले नाहीत. यानंतर आता दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात येतं कीसंबंधित रुग्णांची हिस्ट्री आम्हाला माहिती होती, मग सर्व माहिती असतानाही रुग्णालयाने तात्काळ उपचार का नाही केला?, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.



## पंतप्रधान मोदींनी लोकार्पण केलेले नंगारा संग्रहालय ६ महिन्यानंतर खुले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, अकोला :** बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवी येथे भव्य दिव्य नंगारा वास्तू संग्रहालय उभारण्यात आले आहे. बंजारा समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या संग्रहालयाचे ५ ऑक्टोबर २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झाले होते. सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र तब्बल सहा महिन्यानंतर आजपासून ते खुले झाले. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बंजारा समाजाची गठ्ठा मतपेढी लक्षात घेऊन संग्रहालयाचे तांत्रिक काम अपूर्ण असतानाच पंतप्रधानांच्या हस्ते संग्रहालयाचे लोकार्पण उरकण्यात आले होते. आता त्याचे काम पूर्ण झाल्याने पर्यटकांसाठी ते खुले केले.



वाशीम जिल्ह्याच्या मानोरा तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे बंजारा समाजाची संस्कृतीचे संवर्धन होऊन त्याचे दर्शन सर्वांना घडण्यासाठी राज्य शासनाने नंगारा आकाराची भव्य-दिव्य वास्तू साकारली. त्यामध्ये बंजारा समाजाचा वारसा देखावे, चलचित्र आणि संगीताच्या संयोजनातून डोळ्यासमोर उभा केला. या संग्रहालयाचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद मोदी यांनी ५ ऑक्टोबर २०२४ ला केले. संग्रहालयाच्या आतील तांत्रिक कार्य अपूर्ण असतांनाच त्याचे लोकार्पण उरकण्यात आले होते. त्यामागे राज्यातील विधानसभा निवडणुका हा मुख्य उद्देश होता, असे जाणकार सांगतात. संग्रहालयातील तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन त्यावेळी ते सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले केले नव्हते. लोकार्पणानंतर त्याचे काम पूर्ण केले. त्यानंतर बरोबर सहा महिन्यानंतर ५ एप्रिलपासून ही वास्तू सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली झाली.

**संग्रहालयात पर्यटकांसाठी 'ऑडिओ गाईड'**

'बणजारा विरासत' संग्रहालयाची संपूर्ण पाहणी करण्यासाठी सुमारे दोन तासांचा कालावधी लागतो. प्रत्येकाला 'ऑडिओ गाईड' म्हणून हेडफोन देण्यात येणार आहे. पर्यटक ज्या देखाव्यासमोर उभा आहे, त्या देखाव्याबद्दल संपूर्ण माहिती मिळेल. बंजारा शब्दाची उत्पत्ती, बंजारा समाजाचे ऐतिहासिक संदर्भ, बंजारा समाजातील न्यायव्यवस्था, धार्मिक अधिष्ठान, पेहराव, राजकीय परंपरा याचे दर्शन वेगवेगळ्या दालनांमधून घडते. भगवान गौतम बुद्ध, संत कबीर आणि शीख यांच्या देखाव्यातून धार्मिक सलोख्याचे वास्तव चित्रण स्पष्ट होते.

**निवडणूक आणि भूमिपूजन-लोकार्पणाचे कनेक्शन**

राज्यातील युती सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना नंगारा वास्तू संग्रहालयाला मंजुरी मिळाली होती. डिसेंबर २०१८ मध्ये २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी देवेंद्र फडणवीस व उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये नंगारा भवनाचे भूमिपूजन झाले होते. त्यानंतर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या अगदी तोंडावर अपूर्ण काम असतांनाही नंगारा भवनाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ५ ऑक्टोबरला लोकार्पण झाले. सहा महिन्यानंतर आता ते सर्वसामान्यांसाठी खुले केले.

# संपादकीय



## फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोग

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी सशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेषतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. तीन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुडचा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

# ॥सत्संगाचा सुगंध राम ॥



चैत्र शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला साजरी होणारी रामनवमी केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच महत्त्वाची नाही तर सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. प्रभू श्रीराम आपल्याला नेहमीच सत्य, न्याय आणि धर्माच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र हे आपल्या भारतीय संस्कृती आधारस्तंभ आहेत. प्रत्येकाच्या हृदयात ते विराजमान आहेत. त्यांचे जीवन म्हणजे संपूर्ण राष्ट्राला त्यांनी जगण्याचा मार्ग दाखवलेला आहे. संसारात राहून सामाजिक, नैतिक, कौटुंबिक, आणि राजकीय मर्यादा पाळून पुरुष सदाचरणी राहू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रभू श्री रामचंद्र.

हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यात चैत्र शुध्द नवमीस प्रभू रामाचा जन्म झाला.त्या दिवशी सर्व ठिकाणी रामनवमीचा सोहळा उत्साहात साजरा केला जातो. मंदीरांना रंगरंगोटी केली जाते.समोर. सभा मंडप उभारले जातात. रंगीबेरंगी पताका लावल्या जातात. विद्युत रोषणाई केली जाते.संपूर्ण देशभरात रामनवमी उत्साहात साजरी केली जाते. अयोध्ये पासून ते रामेश्वर पर्यंत हा सोहोळा साजरा होतो.आपल्या संस्कृतीत हा दिवस अतिशय महत्वाचा मानला जातो.

माध्यान्य काळी सुर्य डोक्यावर येतो तेव्हा ठीक बारा वाजता राम जन्माचा सोहळा साजरा करतात. त्याआधी रामजन्मावर आधारित कीर्तन, प्रवचन होते.ते बरोब्बर बारा वाजता संपताच, गुलाल उधळून, जयजयकार केला जातो, वाजंत्री वाजते. फटाके फोडले जातात.बत्ताशांची उधळण होते. हा प्रसाद मिळवण्यासाठी हजारो भाविक गर्दी करतात. पाळणा हलवला जातो. काही ठिकाणी जन्माचा पाळणाही म्हणतात. रामाची आरती करुन,बत्तासा,सुंठ धणे गुळाचा प्रसाद सुंठ वडा, (त्याला पंजिरी, म्हणतात) वाटला जातो. रामनवमीच्या उत्सवाची सुरूवात काही मंदिरात गुढीपाडव्या पासून होते, तर काही मंदिरात रामनवमी पासून पुढे आठ दिवस कार्यक्रम होतात. या काळात नैमित्तिक भजन, कीर्तन, प्रवचनाचे कार्यक्रम असतात. काही विशेष कीर्तनकारांची, प्रवचनकारांचे, कार्यक्रमांचेही खास आयोजन केले जाते. गीत रामायणकार ग.दी.माडगूळकर, आणी गायक सुधीर फडके (बाबूजी)यांनी गीतरामायण हा कार्यक्रम अजरामर केला. गीत रुपाने रामायणातील प्रसंग त्यानी आपल्या गीतातून डोळ्या समोर उभे केलेत. अनेक ठिकाणी गीतररामायणाचे कार्यक्रमाच आयोजन आठवडाभर केल जात. श्रोते मंडळींना ह्या काळात ही खास मेजवानीच असते.

श्रीरामास भगवान श्री विष्णूचा सातवा अवतार समजला जातो. देवता आणि अवतार यांच्या जन्मदिवशी त्यांचे तत्व भूतलावर अधिक प्रमाणात कार्यरत असते. श्री रामही अवतारी देवता असल्यामुळे श्रीराम नवमीला श्रीराम तत्व हे हजार पटीने कार्यरत असल्याचे मानले जाते. म्हणून ह्यादिवशी श्रीरामरक्षा पाठ, श्रीराम जय राम जय जय राम. ह्या मंत्राचा जप, केल्याने अधिक पटीने लाभ मिळत असतो. म्हणून अनेक मंदिरात राम नाम जपाची बारी लावून अखंड जप केला जात असल्याचे दिसते. गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळात दररोज १३ वेळा राम रक्षा स्तोत्र श्रद्धापूर्वक म्हटल्यावर ते सिद्ध होते.रामरक्षेत प्रत्येक अवयवांचे साठी स्वतंत्र श्लोक आहे.त्यामुळे त्या त्या अवयवांचे विकार बरे होतात..

**राम रक्षा पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।**
**शिरो मे राघवः पातु भालं दशरथित्मजः ।।**
**कौसल्येयो दृशौपातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।**
**घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।**
**जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितनः ।**
**स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।।**
**करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजितः ।**
**मध्यं पातु खरध्वंसी नाभि जाम्बवदाश्रयः ।।**
**सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।**
**उरु रघुत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।**
**जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।**
**पादौ बिभीषणश्रीदः पातु रामीखिलं वपुः ।।**

असे कवच या रामरक्षा स्तोत्रात आलेले आहे. कवच म्हणजे आपल्या प्रत्येक अवयवाचे रक्षण करण्यासाठी मंत्र धारण करणे.

**पातालभूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः।**
**न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ।।**

पाताळ भूमी आणि आकाश या तिन्ही लोकांत संचार करणारे छद्मचारिणः म्हणजे राक्षस राम नावाने रक्षलेल्या लोकांकडे नजर वर उचलून पाहू शकत नाही.

म्हणूनच रामरक्षा,। रामस्तुतीचे पठण,. हनुमानाचे हनुमान चालीसा पठण, राम नामाचा जप, रामचरितमानसाचे पठण,. केल्याने संकट निवारण होते दुःखापासून मुक्ती मिळते मनोकामना पूर्ण होतात सुख–समृद्धी होते.

**रामरामेति रामेति**
**रमे रामे मनोरमे ।**
**सहस्त्रनाम तत्तुल्यं**
**रामनाम वरानने ।।**

उत्सव काळात मंदिरातील मूर्तीला, विविध प्रकारचे पोषाख, फुलांचे हार चढवले जातात. तसेच ह्याच काळात काही शहरात एक दिवस रथयात्रेच आयोजन असते.रथातून श्रीरामाची नगर प्रदक्षिणा असते.सकाळी साडेसात –आठ वाजता रथयात्रेस प्रारंभ होतो. रथाला दोर लाउन रथ ओढला जातो.प्रदक्षिणेच्या मार्गावर घराघरातून आरती, (त्याला कानगी म्हणतात. त्यात बत्ताशे, पाच खारका, आणि संस्थानला देणगी रुपात काही रक्कम असते.) दिली जात असते. आपल्याला त्यांच्याकडून बत्तासे आणि पंजीरीचा प्रसाद मिळतो. उन्हाची पर्वा न करता ढोल–ताशा,लेझीम पथक उत्साहानं लेझीम खेळत असतात. काही ठिकाणी बाहेर गावाहून लेझीम पथक बोलावली असतात.गोफ पथक असतात. संध्याकाळी साडेपाच –सहा वाजता रथयात्रा स्थानी पोहचते. उत्सवाचेच काळात पालखीतूनही श्रीरामाची नगर प्रदक्षिणा होते.

अनेक ठिकाणांच्या उत्सवातून दशावतार(अनेकदा यांना दशावतारी सोंग) काढले जातात.माणंसच मुखवटे धारण करुन नाचतात. प्रत्येक अवतार प्रगट होतांना फटाके फोडले जातात आणि तो अवतार प्रकट होतो.वाद्यांच्या तालावर ते नाचतात. एकेक अवतार साधारणपणे पंधरा–वीस मिनिटे ते अर्धा तास नाचतो. त्यात, मत्स्यावतार, देवी, खंडोबा,नारसिंह, राजा, महिषासुर असे अनेक प्रकार असतात. अनेक वर्षा पासूनची ही प्रथा चालत आली आहे. मध्यरात्री पर्यत हा कार्यक्रम असतो. जळगाव भागात,जळगाव येथे चिमुकले राम मंदिर, जुन्या जळगावातील राममंदिर, जामनेर येथील नगारखाना भागातील राममंदिर, येथे मंत्री गिरीश महाजन यांचे उपस्थितीत कार्यक्रम होतात. शेंदुर्णि येथील राममंदिर, नासिक येथील काळाराम मंदिर, पुण्याच्या तुळशीबागेतील पेशवेकालीन राममंदिर, गोंदवले येथील थोरले व धाकटे राममंदिर, श्री गजानन महाराज संस्थान शेगाव, मुंबई, ठाणे, नागपूर, छ.संभाजी नगर, शिर्डी, आळंदी, अक्कलकोट, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी रामजन्म धूमधडाक्यात साजरा होतो.

सत्संगाचा सुगंध राम, कैवल्याची मुर्ती राम, चराचरातील स्फुर्ती राम, कर्तव्याचे पालन राम, सकल सुखाचा सागर राम, आदर्शाचा आदर्श राम, एकवचनी हा देव महान, अशा अनेक विशेषणांनी प्रभु श्रीरामाचे वर्णन केल आहे.

नैतिक, राजकीय –सामाजिक, कोटुंबिक, मर्यादेच उल्लंघन न होऊ न देता पुरूष उत्तम कसा असतो ह्याच उदाहरण म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम रामहे आहे.रामाचे संपूर्ण जीवनच मार्गदर्शक स्त्रोत आहे. एक कोटुंबिक आदर्श आहेत. मातृ–पितृ भक्ति अनुकरणिय आहे.

आजही ग्रामीण भागात एकमेकांशी गाठभेट झाल्यास हात जोडून रामराम म्हणायची पद्धत आहे.तो एक संस्कार आहे. चांगल्या राज्याची संकल्पना म्हणून रामराज्य शब्द प्रचलित आहे...रामराज्य येऊन जनता सुखी होईल अशी नेहमीच आपण सर्व अपेक्षा करत असतो...

प्रभू श्री रामचंद्र एक आदर्श पुरुष तर होतेच तसेच एक बाणी, एक पत्नी, एक वचनी होते. मातृ–पितृ भक्ती, बंधुप्रेम, सत्य वचन, असे अनेक आदर्श गुण त्यांच्यामध्ये होते. ज्या राज्यातील प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानी असते अशा आदर्श राज्याला रामराज्य म्हणतात. आपण सगळेच राम राज्याची कल्पना करत असताना या सगळ्या गोष्टी ओघाने लक्षात घ्यायला हव्यात.

भगवान प्रभू रामचंद्र हे केवळ एक धार्मिक व्यक्तिमत्वच नाही तर ते योग्य जीवन जगण्याचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन– सत्य, नीतिमत्ता, कर्तव्य, त्याग आणि प्रेम यासारख्या सद्गुणांनी भरलेले होते. आपल्या जीवनात हे गुण आत्मसात करून आपण एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करूया. सर्वांना राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा.!

रामावर भरवसा असल्याने आपण रामभरवसे शब्दप्रयोग करत असतो...आपल्या प्रत्येकाला आपले जीवन रामाचे चरणी समर्पित व्हावं असेच वाटत असते.

संकटे, दुःख दूर होणे साठी, सुखसमृद्धी, मनोकामना पूर्ण होण्यासाठी रामनामाचा जप आपण करा,पण त्याचबरोबर आदर्शांचा आदर्श राम म्हणत असतांना त्याचा काही तरी अंश,गुण आपल्यात उतरायला हवा.तरच.रामनामाचे जपाचे सार्थक होईल.

**शेवटी....**

*राम नाम उच्चरा जन्माचे सार्थक करा.*
*नामस्मरणे मुनिजन तरले..*
*तारक मंत्र जपा..*
*ॐ श्रीराम जय राम जय जय राम...*
*ॐ श्रीराम जय राम जय जय राम...*
*आनंदाचा आनंद राम.*
*श्रीराम जय राम जय जय राम....*
*त्रिभुवन तारक आहे राम*
*श्रीराम जय राम जय जय राम...*



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर, ८९९९५६६९१७**

## रामराया..

अमर्याद बाहुबळ
मर्यादा पुरुषोत्तम
मनुष्य अन् देवत्व
अलौकिक संगम

सर्वज्ञ न् स्थितप्रज्ञ
अतुल्य कार्यक्षम
विरळा असे राजा
प्रभुराम तुझ्यासम

युध्दनिती प्रावीण्य
गाजवी ते विक्रम
कैक कलागुणांचा
तू मिलाप विहंगम्

प्रजेच्याकल्याणार्थ
सदोदित अग्र क्रम
कर्तव्या परायणता
पाळे समस्त धरम

माहित भविष्य परि
करत राहिला करम
रामम्हणत निर्वतला
रावण राक्षस अधम

अश्वमेध फल प्राप्ती
कुणा मनी ना संभ्रम
परिटाच्या संशयाचा
रे दूर केलास विभ्रम

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अतिशहाणपणा काय कामाचा ?

आजकाल स्वतःला मीच लय शहाणा समजणाऱ्या लोकांचा सुळसुळाट खूप वाढला आहे. अशा लोकांना दुसऱ्यांचा शहाणपणा जराही बघवत नाही. दुसऱ्याने केलेली एकही शहाणपणाची गोष्ट त्यांना ऐकू वाटत नाही. ते दुसऱ्यांच्या बुद्धीला सलाम करण्याऐवजी ते त्यांचा अपमान करण्याचे बघतात. ते लोकांच्या मेंदूला सारखे पाण्यात पाहतात. आणि मीच किती ज्ञानी व बुद्धिवान आहे, असे लोकांना दाखवून देतात. ते आपला शहाणपणा सिध्द करण्यासाठी वाट्टेल त्या मार्गाचा वापर करतात. चारचौघात चर्चेला बसल्यावर आपलेच रान हाणतात.



खोटे बोल पण रेटून बोल या म्हणीप्रमाणे, दुसऱ्याला मोठ्या आवाजात बोलून आपलीच लाल करण्याचा प्रयत्न करतात. अशा अतिशहाण्या लोकांना एक खूप घाणेरडी सवय असते. ती म्हणजे दुसऱ्यांच्या चर्चेत जाऊन मचकून काहीतरी बोलणे. समोरची पार्टी काय बोलत आहे? आणि आपण कोणत्या विषयावर बोलत आहोत? याचे त्यांना काहीही देणे–घेणे नसते. फक्त आपणच किती शहाणे आहोत? हे लोकांना दाखवण्याचा ते पुरेपूर प्रयत्न करतात. ते आपलेच खरे करण्याच्या नादात भांडण–तंटे करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. जिथे जाईल तिथे ते लोकांना वेड्यात काढून आपण किती शहाणे आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना हे कळायला हवे की, आपण लोकांना मूर्खात काढण्याच्या नादात आपण स्वतःच किती महामूर्ख होऊन जातो? याचा जरा विचार करायला हवा. कारण हे स्वतःला अतिशहाणे समजणारे लोक घरातील आईवडीलांच्या, समाजातील जेष्ठ मंडळींच्या व शाळेतील गुरुजनांच्या विचारांना न जुमानता त्यांना आपलाच शहाणपणा शिकवण्याच प्रयत्न करतात. म्हणजे त्यांच्या विचारांना कवडीमोल समजून पायतळी तुडवतात. सांगायचा मुद्दा म्हणजे हे अतिशहाणे लोक स्वतःच्या आईवडीलांना व शाळेतील शिक्षकांना शहाणपणा शिकवायला जाऊन स्वतःला नकळत पार बर्बाद करून घेतात. मग सांगा असला अति–शहाणपणा काय कामाचा आहे? स्वतःच्या मायबापाचा, समाजातील व गावातील जेष्ठ मंडळींचा व शाळेतील गुरुजनांचा जर तुम्ही अनादर करत असाल व त्यांच्या विचारांना पायतळी तुडवत असाल, तर तुम्ही या जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तर यशस्वी व्हाल असे मला वाटत नाही. कारण या जगात जेवढे महामानव होऊन गेले त्या महामानवांनी प्रथमतः कोणाचा तरी आदर्श घेऊन व कोणाला तरी आपला गुरु मानून आणि त्यांचे विचार आत्मसात करून यशोशिखरावर पाय ठेवला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर व महात्मा फुले यांना आपले आदर्श मानून सिम्बॉल ऑफ नॉलेज ही पदवी मिळवली आहे. त्यांना ज्ञानाचे प्रतीक असे म्हणतात. तर छत्रपती शिवाजी महाराजांनी मासाहेब जिजाऊ, शहाजीराजे भोसले व संत तुकाराम महाराजांचे विचार आत्मसात करुन स्वराज्याची स्थापना केली आहे .

सांगायचा मुद्दा म्हणजे या जगात जर तुम्हाला नामवंत लोकांच्या यादीत जर झळकायचे असेल तर आपल्याला सर्वप्रथम कोणाला तरी प्रेरणास्थान मानावे लागेल. आणि त्यांच्या आचारांना–विचारांना महत्त्व देऊन, त्यांचे शहाणपणाचे चार बोल ऐकावे लागतील तरच आपण खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी व्हाल. नाहीतर आपणच किती शहाणे व ज्ञानी आहोत हे लोकांना दाखवण्याच्या नादात एक दिवस आपण स्वतःच संपून जाल! यवढे मात्र नक्की! त्यासाठी मित्रांनो अति–शहाणपणाचा कळस मोडीत काढून, घरातील आई–वडीलांच्या, गावातील मान्यवर मंडळींच्या व महापुरुषांच्या आचारांना व विचारांना प्रथम प्राधान्य देऊन आपण तशी वाटचाल केली पाहिजे म्हणजे नक्कीच आपल्या जीवनात आनंदाची व सुखाची मंगलमय पहाट उगवेल....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खडाळी, ता.अहमदपूर जि.लातुर**
**मो.७४९८७१५६६१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कमलाबाई माधव वाघ या मुंबईतुन हरवल्या आहे



कमळाबाई माधव वाघ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.५, विंचूर (नाशिक) :** मुंबई येथील कमलाबाई माधव वाघ या मुंबई येथे त्यांच्या मुलीकडे वास्तव्यास होत्या. त्या बृहन्मुंबई शहरातुन दि. २९/०७/२०२४ रोजी रात्री ९:३० वा. पासून हरवल्या आहे. पोलिसात हरवल्याची नोंद केली आहे. पण अद्याप पावेतो त्या सापडल्या नाही. त्यांचे वर्णन- वय ८०, रंग गोरा, उंची ५ फूट, या कोणाला दिसल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. श्रीमती अलका राजू घोलप. **मोबा.- ९२२४६४५३३७**, बाळा राजू घोलप- **७२०८९७९७१५**, वसंत कचरू वाघ - ९८८१५५१४६३. पत्ता - श्रीमती अलका राजू घोलप. बिल्डिंग नंबर ३३, रूम नंबर १११२ पी. एम. जी. पी. कॉलनी, मानखुर्द (पश्चिम) मुंबई - ४०००४३. या पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क साधावा.

## तेजराव बागडे यांना सेवानिवृत्ती निरोप !



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** सावनेर तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय येथील नुकतेच सेवानिवृत्त झालेले सहाय्यक शिक्षक तेजराव बागडे यांचा सपत्नीक सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य अरुण वडस्कर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य चंद्रशेखर लिखार, विशेष अतिथी म्हणून पर्यवेक्षक पद्माकर राऊत, सिल्लेवाडा येथील माजी प्राचार्य समीर पिल्लेवान, प्रा. विजय टेकाडे, ग्रामीण पोलीस कर्मचारी सारिका वासनिक आदींची प्रामुख्याने उपस्थित होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तेजराव बागडे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तु देऊन सत्कार करण्यात आला. शाळेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या कार्याची दखल घेऊन सौ. जयश्री तेजराव बागडे यांनी ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सर्व शिपाई यांचा गौरव केला. याप्रसंगी गुणेश्वर गजभिये यांनी आपले मनोगत व्यक्त करीत बागडे यांच्या जीवनावर व सामाजिक, शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. शाळेचे संगीत शिक्षक मनोज गायकवाड यांनी गीत गायन करून वातावरण प्रसन्न व भावुक केले. शाळेतील वर्ग नायकाने ट्रॉफी देऊन सर्व विद्यार्थ्यांतर्फे शुभेच्छा दिल्या व मनोगत व्यक्त केले. समारंभाला उपस्थित मान्यवरांनी बागडे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री खेताडे यांनी तर आभारप्रदर्शन नलिनी काकडे यांनी केले. समारंभाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे योगदान मोलाचे ठरले.

## पोखरी सेवासंस्थेच्या चेअरमन पदी बाळासाहेब कोकाटे व्हा. चेअरमनपदी भाऊ दरेकर यांची बिनविरोध निवड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर अहिल्यानगर :** तालुक्यातील पोखरी विवीध कार्यकारी सहकारी सेवासंथेच्या चेअरमन पदी बाळासाहेब रंगनाथ कोकाटे व व्हा चेअरमन पदी भाऊ नकाजी दरेकर यांची बिनविरोध निवड झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी विकास जाधव होते. पोखरी विकास सोसायटीचे मावळते चेअरमन महादू शंकर पवार व्हा. चेअरमन रमेश कारंडे यांनी राजीनामा दिल्याने ही पदे रिक्त होती संचालक मंडळाच्या सभेत पुढील वर्षासाठी बुधवारी (दि.३) निवडणूक निर्णय अधिकारी विकास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर येथील सहाय्यक निंबधक कार्यालयात संचालक मंडळाची बैठक बोलविण्यात आली होती. यावेळी चेअरमन पदासाठी बाळासाहेब कोकाटे यांची तर व्हा चेअरमन पदी भाऊ दरेकर यांचा निर्धारित वेळेत प्रत्येकी एक एक अर्ज प्राप्त झाल्याने यावेळी त्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक साहेबराव रोकडे, ज्ञानदेव पवार, लक्ष्मण कारभारी आहेर, बाबाजी खैरे,सावकार गुंजाळ, पिराजी कारंडे, माजी सरपंच अंकुश काशीद, ग्राम. प.सदस्य संजय थोरात, प्रगतिशील शेतकरी बनशी काशीद. अरुण बेलकर, उत्तम कोकाटे, सेक्रेटरी राहुल सुडके आदींसह सभासद समर्थक उपस्थित होते.

## भंगारवाल्याने आदिवासी महिलांना मारली कानफाटात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. ०५, दहिसर (ठाणे) :** नैमुल्ला हिनामुल्ला खान, वय- ४० वर्षे, धंदा- भंगार, राह-नेता कंम्पाउंड ता. जि.ठाणे, अझर अली अब्दुल गनी, वय-४८ वर्षे, धंदा. भंगार, शिळफाटा, सलीम खान, हे आदिवासींच्या घराजवळ कचरा टाकण्यासाठी आले होते.तक्रारदार पदीबाई कमलाकर निरगुडे, वय-४६ वर्षे, धंदा- गृहीणी, राह-स्वताचे घर, लोहार पाडा, ठाकुरपाडा ता. जि.ठाणे,त्यावेळी तक्रारदार यांनी विरोधक यांना कचरा येथे टाकु नका असे सांगितल्याने विरोधक क्र.०१,०२,०३ यांनी तक्रारदार त्याच्या सोबत आलेले मंदा राजु अवस्कर, वैशाली गणेश निरगुडे यांना शिवीगाळ केली तसेच विरोधक क्र.०१ यांनी तक्रारदार यांना हाताचे चापटीने मारहाण केली म्हणुन तक्रार. शिळ डायगर पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आली आहे. विनयभंग व आदिवासी कायदा अंतर्गत गुन्हे दाखल झाले पाहिजे अशी मागणी नागरिक करत आहेत. सध्या आरोपी पोलिसांच्या कस्टडीत आहेत.

# दोन बलात्कारी गुन्ह्यातील रिल स्टार आरोपीस नाशिक येथुन अटक...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, ठाणे :** मानपाडा पोलीस स्टेशन गुरजिनं ३४१/२०२५ बीएनएस कायदा कलम ६४, ७४, ११५(२), ३५१(२), ३(५) सह आर्म ऍक्ट कायदा कलम ३,२५ व टिळकनगर पोलीस स्टेशन गुरजिनं २६७/२०२५ भादंवि कलम ३७६ (२), (एन) ५०४, ५०६ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील पाहीजे असलेला आरोपी सुरेंद्र पांडुरंग पाटील (वय: ५२ वर्षे), राहणार. चौधरी बिल्डिंग, २ रा माळा, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, बारा बंगला रोड, ठाकुर्ली, डोंबिवली (पुर्व) हा गुन्हे दाखल झाल्यापासुन फरार झालेला होता व सापडत नव्हता. सदर पाहीजे आरोपी सुरेंद्र पांडुरंग पाटील याचा गुप्त बातमीदारांकरवी शोध घेतला असता तो 'हॉटेल सेलीब्रेशन' जिल्हा नाशिक याठिकाणी लपुन बसला असल्याबाबत माहीती प्राप्त झाली होती.

सदर मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने आरोपी सुरेंद्र पांडुरंग पाटील यांस इंदीरानगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर यांच्या मदतीने खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी 'हॉटेल सेलीब्रेशन' जिल्हा नाशिक येथुन दिनांक ०४/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०८.०० वाजता पकडून ताब्यात घेतले असुन, त्यास पुढील तपासकामी मानपाडा पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई मा. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. डॉ. पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), ठाणे शहर मा. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), ठाणे, मा. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे शाखा,

ठाणे तथा प्रभारी अधिकारी खंडणी विरोधी पथक मा. विनायक घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध -२, गुन्हे शाखा, ठाणे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. नरेश पवार, सपोनि. सुनिल तारमळे, श्रीकृष्ण गोरे, पोउपनिरी. सुहास तावडे, सपोउपनिरी. संदीप भोसले, पोहवा. ठाकुर, पाटील, गायकवाड, जाधव, गडगे, मपोहवा. पावसकर, पोना. हासे, मधाळे, चापोना. हिवरे, पोशि. वायकर, ढाकणे यांनी यशस्वीपणे केली आहे.

## मुदखेड तालुक्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने ४३ सदस्यांचे सदस्यत्व रद्द

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील विविध ग्राम पंचायतीमधील काही सदस्यांना आणि थेट निवडलेल्या सरपंचांना जात वैधता प्रमाणपत्र साधरण केल्यामुळे आपले सदस्यत्व गमवावे लागले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर पंचायत समिती प्रशासन ही कारवाई केली आहे या कारवाईमुळे व राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मुदखेड तालुक्यातील आणि ग्रामपंचायतच्या निवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या सदस्यांना निवडणुकीच्या नियमानुसार विहित मुदतीत जात वैधताचा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते. मात्र काही सदस्यांनी या नियमांचे पालन केले नाही. यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याची दखल घेतली आणि पडताळणी करण्याचे आदेश दिले.

पडताळणीत काही सदस्य आणि थेट निवडलेल्या सरपंचांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र साधरण न केल्याचे आढळून आले त्यानंतर जिल्हाधिकार्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १० नुसार या सदस्यांचे सदस्य रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्याला या मार्फत तहसील कार्याला प्राप्त



GOVERNMENT OF MAHARASHTRA
Social Justice and Special Assistance Department
CERTIFICATE OF VALIDITY
No. A
CASTE CERTIFICATE SCRUTINY COMMITTEE

तालुक्यातील सदस्यत्व रद्द झालेली खालील प्रमाणे

१) चिकाळातांडा लहान-झाजाबाई पंडित चव्हाण २) चिलपिंपरी -अनुसयाबाई मारुती पांचाळ ३) देरगाव वाडी- इंद्राबाई किसन घारके ४) देवापुर- शांताबाई महासाजी टोकलवाड ५) डोंगरगाव- यल्लाप्पा चिमणाजी ओरसवाड ६) गोपाळवाडी - बायनाबाई मारुती गायकवाड ७) राजापूर - पुनम रघुनाथ मात्रे , धुरपत बाई बेगाजी गायकवाड ८) कामळज - सुमनबाई शंकर कोकरे, किसन भुजाजी कोकरे ९) कोल्हा - कमलबाई चंदन तोंडेवाड, मीना पांडुरंग गायकवाड, पांडुरंग बालाजी गायकवाड १०) महाटी - इंद्राबाई महादु जाधव ११) माळकौठा - रेखा साईनाथ गोणेवाड, शांताबाई बालाजी सोमठणवाड, चंद्रकला शंकर पांचाळ, गणपती पांडुरंग गायकवाड १२) मेंडका - शशिकलाबाई लक्ष्मण इजळकर १३) निवघा- आशाबाई मारुती अटकलवाड १४) पार्टी वैजापूर - मीनाक्षी नागोराव सुंकलवार १५) पिंपळकौठा चोर - किरण रामचंद्र दिवटेवाड १६) पिंपळकौठा मगरे - कविता संजय अजनवाड १७) राजवाडी - प्रयागबाई साईनाथ महादवाड, रुक्मीनबाई विठ्ठल लोखंडे १८) रोहीपिंपळगाव - रेखाबाई यंकटराव गंगोत्री उपसरपंच, शंकर विठ्ठल गंगोत्री, आनंदा रामा भालेराव, मिराबाई भुजंगराव कोकणे १९) रोहीपिंपळगाव तांडा - सत्यभामा प्रभू पांचाळ २०) सरेगाव - सिद्धेश्वर भीमराव सरेगावकर

२१) शेंम्बोली -लक्ष्मीबाई श्यामसुंदर शहापुरे २२) टाकळी - धुरपतबाई आनंदा कोलते २३) वैजापूर पार्डी - सुनील नंदकिशोर चाळनेवाड , साहेबराव गंगाधर मंगलारपे २४) वाडी मुक्तापूर - बालाजी मारुती गव्हाणे २५) वाडी नियमतुलापुर - गिन्यानबाई शिवाजी मेंढेवाड २६) वाई - प्रतिभा बालाजी पेंटेवाड, लामटिळे रामा नामदेव, हनवंते भगवान शंकर, हनवंते ज्योती आनंदा, सोनकांबळे सुमनबाई गणेश आदींचा समावेश आहे.

९ जुलै २०२४ रोजी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे या या ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.

## किशोरवयीन गुन्हेगार बालकांच्या पुनर्वसनासाठी हेल्प डेस्क पुन्हा सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** मुलांचे हक्क व किशोरवयीन गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी, कायदेशीर, सामाजिक, समुपदेशन सेवा पुरविण्यासाठी राज्यातील निरीक्षणगृहांमध्ये हेल्प डेस्क स्थापन करण्याचा प्रस्ताव दातृत्वशील उद्योगपती अझीम प्रेमजी यांनी दिला होता. त्यांच्या या प्रस्तावास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. हे हेल्प डेस्क सामाजिक संस्थांमार्फत चालविण्यात येणार आहेत. न्याय प्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांच्या (चिल्ड्रन इन कॉनफ्लिक्ट लॉ -!(सीसीएल) पुनर्वसनासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस), किशोर न्याय संसाधन कक्ष (आरसीजेजे) आणि महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यात ऐतिहासिक करार करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, हेल्प डेस्क' स्थापन करणे सीसीएल मुलांकडे सन्मानाने व सहवेदनेने पाहण्याचा प्रयत्न असून, त्यांच्या सामाजिक- कायदेशीर स्वरूपाच्या शंका, तक्रारी ऐकून त्यांना मदत करण्याचे एक साधन आहे. यामुळे लहान वयातच योग्य मार्गदर्शन देऊन, या मुलांना समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या नागरिकांमध्ये रूपांतरित करण्याचा शासनाचा हा प्रयत्न आहे.

न्याय प्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांशी संबंधित प्रश्न हे केवळ मानवाधिकारांचेच नव्हे, तर शाश्वत मानवी विकासाचेही गंभीर मुद्दे आहेत. अशा मुलांचे पुनर्वसन करणे ही महाराष्ट्र शासनाची अत्यावश्यक व उदात्त जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या हेल्प डेस्कच्या स्थापनेनंतर कायदेशीर प्रक्रिया अधिक समजून घेतली जाईल, मुलांचे शोषण व गैरसमज कमी होतील, न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता व मुलांचा आत्मविश्वास वाढेल, पुनर्वसन व समाजात पुनः एकत्रीकरणास चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री यांनी व्यक्त केला. गुन्हेगारीत अडकलेली अनेक मुले गरीब, दुर्बल घटकांतील असून त्यांना कायदेविषयक माहितीचा अभाव असतो. अनेकदा वकिलांकडून दिशाभूल, समाजातील कलंक व भावनिक आघात यामुळे न्याय प्रक्रियेत अडथळे येतात. पालकही अनेकदा कायदेशीर प्रक्रियेबाबत अनभिज्ञ असतात, तसेच मुलांनी अमली पदार्थापासून दूर राहण्यासाठी त्यांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी या हेल्प डेस्क ची मदत होणार आहे.

तसेच सी सी एल व त्यांच्या पालकांना त्यांच्या हक्कांची व कायदेशीर प्रक्रियेची माहिती देणे, बाल न्याय मंडळ, वकील, सीडब्ल्यूसी व अन्य संबंधित यंत्रणांशी समन्वय, प्रशिक्षणप्राप्त स्वयंसेवकांद्वारे सातत्यपूर्ण सेवा या हेल्प डेस्क द्वारे दिली जाणार आहे.

हा उपक्रम प्रथम टप्प्यात नागपूर, यवतमाळ, लातूर, पुणे आणि ठाणे या पाच जिल्ह्यांत राबविण्यात येणार असून, दरवर्षी किमान ४००० मुलांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे. यानंतर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात हा उपक्रम विविध स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) सहकार्याने राबविला जाईल.

## मुदखेड तालुक्यातील रोहीपिंपळगाव येथे पती पत्नीचा मृत्यू...

### पतीची गळाफास तर पत्नी मृत अवस्थेत आढळली...

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील रोहीपिंपळगाव येथील शेतकरी बाबासाब बाजीराव शिंदे वय ४० वर्ष यांनी गळफास घेतली तर पत्नी रुक्मिणी बाबासाब शिंदे वय ३५ वर्ष हे त्याच ठिकाणी मृत्यू अवस्थेत दिसून आल्याची घटना दि.४ एप्रिल रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान त्यांच्या स्वताःच्या शेतात घडली आहे.





रोहीपिंपळगाव येथील शेतकरी बाबासाब बाजीराव शिंदे व त्यांच्या पत्नी रूक्मीनबाई बाबासाब शिंदे हे दोघेही रोहीपिंपळगाव आपल्या घरून सकाळी नेहमीप्रमाणे शेतामध्ये गेले होते. परंतु दुपारी एकच्या दरम्यान बाबासाब शिंदे हा लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचं दिसून आले. तर पत्नी त्याच ठिकाणी मृत्यू अवस्थेत जमिनीवर दिसून आली. या घटनेची माहिती आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी दिल्याने गावातील नागरिकांनी बाबासाब शिंदे यांच्या शेताकडे धाव घेतली. या घटनेची माहिती रोहीपिंपळगाव येथील पोलीस पाटील यांनी मुदखेड पोलीस ठाण्याला कळविली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपविभागीय अधिकारी डेनियल बेन, मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे, बिट जमादार दिलीप चक्रधर, रमेश पुणेगोविदवाड, बळवंत कदम, प्रकाश सुनकमवार यांच्यासह आदी पोलिस घटनास्थळी जाऊन घटनेचा पंचनामा केला. घटना शेतातील लिंबाचा झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली तर पत्नी बेशुद्ध अवस्थेत पडून होते. असं पोलीसांकडून सांगण्यात आले मुदखेड ग्रामीण रुग्णालयात पती-पत्नीला दाखल करण्यात आले होते परंतु डॉक्टरांनी रुक्मीणबाई शिंदे यांचा मृत्यू झाला असे सांगितले. हि घटना दुपारी एक वाजताच्या दरम्यान घडली पतीची झाडाला गळाफास घेतलेली आढळून आले तर पत्नी त्याच ठिकाणी मृत्यू अवस्थेत पडलेली होती. सदर घटना आत्महत्या आहे की? हे मात्र शवविच्छेदनानंतर सांगण्यात येईल. अशी माहिती पोलीस ठाणे मुदखेड येथून मिळाली आहे.

शेतकरी बाबासाब बाजीराव शिंदे व त्यांच्या पत्नी रूक्मीनबाई बाबासाब शिंदे यांच्या शवविच्छेदन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयात प्रक्रिया रात्री उशिरा चालू होती. त्यामुळे त्यांच्यावर रोहीपिंपळगाव येथे रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील 'जलजीवन मिशन' कुचकामी निधी अभावी

## ४५७ पाणी योजनांची कामे ठप्प

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** 'जलजीवन मिशन' कार्यक्रमातील पाणीयोजना पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने मुदतवाढ दिली असली तरी या कामांसाठी गेल्या ६-७ महिन्यांपासून निधी उपलब्ध होत नसल्याने जिल्ह्यातील ४५७ पाणी योजनांची कामे जवळपास बंद पडली आहेत. निधी उपलब्ध झाला असता तर यातील अनेक कामे पूर्ण होऊन ऐन उन्हाळ्यात पाणी टंचाईवर मात करता आली असती, टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली नसती. मात्र, योजना असून ही टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येण्याची शक्यता व्यक्त केली जाते. या पाणीयोजनांच्या झालेल्या कामासाठी सुमारे ९० कोटी रुपयांची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदने १५० पाणी योजनांचे सुधारित आराखडे मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवले होते. या पाणी योजनांमधून काही वाड्यावस्त्या, गावे वगळल्याने त्याचाही समावेश करण्याची मागणी होती. त्यानुसार सुधारित



प्रस्ताव पाठवला गेला होता. यापूर्वी ८७ प्रस्तावांना मंजुरी मिळाली होती. आता आणखी २८ पाणीयोजनांच्या सुधारित प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून या संदर्भातील माहिती उपलब्ध झाली. घरोघर नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने जलजीवन कार्यक्रम पाच वर्षांपूर्वी सुरू केला. राज्य सरकारचा ही त्यामध्ये हिस्सा आहे. मात्र, काही महिन्यांपासून झालेल्या कामांच्या तुलनेत अल्प स्वरूपात निधी उपलब्ध होत असल्याने ठेकेदारांकडून कामे जवळपास थांबवली गेली आहेत. २०२० पासून या महत्त्वकांक्षी प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली. जिल्हा परिषदेमार्फत ५ कोटी रुपये खर्चाच्या आतील कामे केली जातात. अशा ९२७ गावांच्या पाणीपुरवठ्याच्या एकूण ८३० योजनांची कामे सुरू करण्यात आली. यामध्ये काही नवीन योजना तर काही पूर्वीच्याच योजनांचे विस्तारीकरण हाती घेण्यात आले आहे. सुरुवातीच्या काळात निधी उपलब्ध होत असल्याने पाणी योजनांच्या कामांना गती मिळाली होती. राज्य सरकारकडून निधी उपलब्धेत आखडता हात येऊ लागल्याने त्याचा परिणाम पाणी योजनांच्या कामावर झाला आहे. सुरुवातीला जलजीवन मिशन कार्यक्रम पूर्ण करण्याची मार्च २०२४ पर्यंत मुदत होती. आता ती वाढवण्यात आल्याचे सांगण्यात आले. अनेक देयके प्रलंबित आहेत. जिल्हा परिषदेने राज्य सरकारकडे मागणी केली आहे. मात्र, तुटपुंजा निधी उपलब्ध होत आहे. आत्तापर्यंत २४३ पाणीयोजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तर ५६७ योजनांची काम प्रगतीपथावर आहेत. जलजीवन मिशन कार्यक्रमातील पाणीयोजनेबाबत लोकप्रतिनिधींकडून वारंवार हरकती तक्रारी उपस्थित केल्या जात आहेत. केंद्र सरकारने योजनांच्या तपासणीसाठी निवृत्त वरिष्ठ अभियंत्यांची पथके नियुक्त केली आहे. या पथकांनी जिल्ह्यातील पाणी योजनांच्या कामांची तपासणी केली आहे. यामध्ये पथकांना त्रुटी आढळून आल्या नसल्याचा दावा जिल्हा परिषदेकडून केला जात आहे.

### बिलांच्या रक्कमेसाठी ठेकेदार मारता येत खेट्या

यासंदर्भात काही अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होत असला तरी राज्य सरकारकडून निधी उपलब्ध होण्यात अडचणी आहेत. ठेकेदारांच्या आर्थिक क्षमतेशी कामाची गती जोडलेली आहे. मात्र, या कार्यक्रमात बहुतांश कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडे आहेत. त्यातूनच पाणीयोजनांच्या कामावर परिणाम झाला आहे. पूर्ण झालेली कामे व त्यांच्या देयकांसाठी उपलब्ध होणारा निधी, यातील विसंगतीमुळे सुमारे ९० कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत.

# शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा : आमदार दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यांना दिनांक ०३ एप्रिल २०२५ रोजी चक्रीवादळ, अवकाळी पाऊस व ढगाळ हवामानाने पुन्हा एकदा जबर फटका दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

रब्बी हंगामातील पिके, भाजीपाला तसेच फळबागांच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावे असे निर्देश आमदार काशिनाथ दाते यांनी तहसीलदार उपविभागीय कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती गट विकास अधिकारी यांना दिले आहे. पारनेर तालुक्यातील



वनकुटे , काकणेवाडी, नारायण गव्हाण, यादव वाडी, मावळेवाडी, वाडेगव्हाण, कुरुंद, पाडळी रांजणगाव, तास या भागात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली असून यामध्ये कांदा, मका, मिरची, कलिंगड, टोमॅटो, झेंडू, डाळिंब, आंबा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जो काही शेतीमाल शेतकऱ्यांच्या हातात आला. त्या मालाला भाव नसल्याने लागवडीचा खर्च ही निघणे मुश्कील झाले आहे. परंतु निसर्गाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांवर सूड उगवला आहे. गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात अवकाळी पाऊस, वादळीवारा, चक्रीवादळ यामुळे रब्बी हंगामातील पिके, भाजीपाला आणि फळबागांचे प्रचंड असे नुकसान झाले आहे. उभी पिके जमीनदोस्त झाली आहेत. तर फळबागांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. अवकाळी पाऊस चक्रीवादळ आणि ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामांकडून असलेल्या अपेक्षांवर पाणी फेरले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्या पारनेर तालुक्यामध्ये विविध गावांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी पुन्हा एकदा मोठ्या संकटात सापडला आहे. अशावेळी शासनाने शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे अवकाळी पाऊस चक्रीवादळ व ढगाळ वातावरणामुळे झालेल्या नुकसानीचे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहे. सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी.

**- आमदार, काशिनाथ दाते**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्याबाबत नियोजन बैठक संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, पनवेल :** लोकसहभागातून महानगर पालिकेच्या सहकार्यातून दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पनवेल शहरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित नियोजन बैठकीत उत्सवाच्या सर्व तयारीची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

यावेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, गणेश शेटे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, चारूशीला घरत, दर्शना भोईर, गणेश कडू, शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, विविध संघटनेचे प्रतिनिधी उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी



डॉ.राजू पाटोदकर, पोलिस अधिकारी व महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता व विविध सुविधा याबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. मिरवणुकीसाठी रुग्णवाहिका, थंडपाणी, अल्पोपहार, एनर्जी ड्रिंक, सुरक्षा रक्षक, लाईट व्यवस्था आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतली जाणार असल्याची माहिती यावेळी उपायुक्ता गावडे यांनी दिली. तसेच मिरवणूकीनंतर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या नूतनीकरणाचे भूमी पूजन व महानगरपालिका मुख्यालयात प्रवेशद्वाराच्या बाजूला संविधान उद्देशिकेचे अनावरण ही यावेळी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जयंती निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध, चित्ररथ, लेझीम व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहेत. शहरातील प्रमुख चौकांमध्ये फ्लेक्स, बॅनर व विद्युत रोषणाईसह आकर्षक सजावट केली जाणार आहे. आंबेडकर भवन ते शिवाजी महाराज पुतळा मार्गावरील दोन्ही बाजूंना लाईटची व्यवस्था करण्यात येणार असून सुरक्षिततेसाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

या बैठकित माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी महापालिकेतर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच जयंती संदर्भात व त्या अनुषंगिक असलेल्या विविध मागण्यांचाही महापालिकेने सकारात्मक पद्धतीने विचार केला असून त्याची अंमलबजावणी झाली आहे. याकरिता महानगरपालिका व आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला तो सर्वांनुमते संमत झाला. तसेच महापालिका राबवित असलेल्या उपक्रमाबाबत बिनेदार यांनी समाधान व्यक्त करून आभार व्यक्त केले.

जयंतीच्या दिवशी सकाळी ७ वाजता नागरिकांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ एकत्र जमायचे असून, ७.३० वाजता पुष्पहार अर्पण, पूजा-पाठ व मानवंदना होईल. त्यानंतर पुतळ्याजवळील भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, एमटीएनएल. रोड, संत जगनाडे महाराज चौक, रोहिदास वाडा, टपाल नाका, कर्नाळा सर्कल, भाजी मार्केट, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, विरुपाक्ष मंदिर, लाईन आळी, गुणे हॉस्पिटल मार्गे आंबेडकर भवन येथे पोहोचून समाप्त होईल.

# थोडक्यात

## राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी मुंबईचा संघाची निवड



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०५, मुंबई :** डॉजबॉल फेडरेशन ऑफ इंडिया व कर्नाटक डॉजबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने साऊथ एशियन ट्रस्ट इंस्टिट्यूट, पूरण येथे दिनांक ०४ ते ०७ एप्रिल २०२५ दरम्यान १७ वी राष्ट्रीय सीनियर मुले व मुली डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. अतिशय समतोल असा मुंबईचा मुलांचा संघ यास्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करेल हा विश्वास आहे. असे मत संघ प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय खेळाडू नरेश राऊत यांनी व्यक्त केले. तसेच प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय खेळाडू नरेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईचा मुलांचा संघ उल्लेखनीय कामगिरी करून मुंबई संघाला विजेतेपद मिळवून देईल अशी आशा संघटनेचे सचिव जगदीश अंचन यांनी व्यक्त केली आहे.मुंबई डॉजबॉल संघास, मुंबई डॉजबॉल असोसिएशन चे अध्यक्ष अरविंद (दादा) प्रभू, ऐश्वर्याताई शेटे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**मुलाचा संघ याप्रमाणे** - ललित नवाळी, विनायक देवकर, मनीष विश्वकर्मा, मोहित द्यावत्त, आदित्य सिंह, राज बदी, प्रणीत पाटिल, उज्ज्वल त्रिपाठी, कृष्णा कोंडाळ, संप्रित पुजारी

**संघ प्रशिक्षक** - नरेश राऊत (आंतरराष्ट्रीय खेळाडू)

## निरा-देवधरचे आवर्तन खंडाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा - डॉ.शिंदे



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०४, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विकास प्रतिष्ठानचे वतीने केलेल्या विनंती नुसार निरा-देवधर (उजवा) कालव्यातून पाणी आवर्तन दि.१९/०३/२०२५ पासून सुरु करण्यात आले होते. या आवर्तन दरम्यान लाभ क्षेत्रातील अंदोरी, कराडवाडी, वाघोशी, मोर्वे, भादे, शेडगेवाडी,शिवाजीनगर, भादवडे,तोंडल, लोणी, भोळी, शेखमिरवाडी, धनगरवाडी,पिसाळवाडी, पानसरे वस्ती या व इतर गावातील बंधारे पाण्याने भरण्यात आलेले आहेत. या आवर्तणामुळे तालुक्यातील उपरोक्त गावातील पाणीटंचाई काही प्रमाणात कमी झाली आहे. सर्व शेतकऱ्यांनी पाणीपट्टी भरुन व पाणी मागणी अर्ज सादर करून प्रशासनास सहकार्य करावे. या पाणी आवर्तना बद्दल निरा -देवधर प्रकल्प कार्यकारी अभियंता स्वप्नील कोडूलकर व त्यांचे सर्व सहकारी अधिकारी, कर्मचारी यांचे तालुक्यातील शेतकऱ्यांचे वतीने विशेष आभार खंडाळा विकास प्रतिष्ठान सचिव डॉ.विजय शिंदे यांनी मानले.

## बारड जि.प.हायस्कूल एन.एम.एम.एस परीक्षेत तालुक्यात प्रथम

### शिष्यवृत्ती प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेने गुणवत्तेची परंपरा कायम राखली असून एन.एम.एम.एस परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावेळी १८ शिष्यवृत्तीधारक गुणवंत विद्यार्थी तर पंजाब येथे आयोजित ३० व्या सब ज्युनिअर नॅशनल बेसबॉल स्पर्धेत श्रद्धा बाबुराव कुलुपवाड या विद्यार्थिनीने कांस्यपदक प्राप्त केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान शालेय समिती व शाळेतील शिक्षकांच्या वतीने करण्यात आला आहे. यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रिया डहाळे, शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पाटील, केंद्रप्रमुख अरुण कुमार अतनुरे, शिक्षणप्रेमी विलास देशमुख, शा.व्य.समिती अध्यक्ष प्रकाश देशमुख, मु.अ.शुभांगीनी तळणकर, कैलास पुलकुंटवार, योगेश रत्नपारखी, शिक्षक प्रसाद जाधव, श्रीपाद बोरिकर, संतोष राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. जि.प.हायस्कूल शाळेत सतत स्पर्धात्मक परीक्षेला वाव दिल्या जात असून बीटीएस, एन.एम.एम.एस, नवोदय, स्कॉलरशिप, होमीबाबा, अशा अनेक परीक्षा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी सराव करून घेतल्या जातात. त्यामध्ये अनेक विद्यार्थी गुणवत्तेत झेप घेऊन पुढील शैक्षणिक कार्यासाठी अग्रेसर होताना दिसतात. गरिबांच्या मुलासाठी बारड जिल्हा परिषद शाळा ही वरदान ठरली असून अनेक विद्यार्थी नवोदय स्कॉलरशिप शिष्यवृत्तीधारक बनत असल्याने त्यांच्या बारावीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च शासन स्तरावरून होत असल्याने याबाबत पालक वर्गातून समाधान व्यक्त केल्या जात आहे. मु.अ.शुभांगीनी तळणकर यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांना शिक्षक ठक्कुरवार, श्रीपाद बोरीकर सुहास अंबाड, प्रसाद जाधव, संतोष राऊत हे विद्यार्थ्यांना यशस्वीपणे अभ्यासात सखोल मार्गदर्शन करत असतात. यावेळी गुणवंत विद्यार्थी प्रेरणा सुकापुरे, वैष्णवी धुडकेवार यांनी शाळेत चालणाऱ्या शैक्षणिक उपक्रमाबाबत सखोल माहिती देत मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मु.अ.शुभांगीनी तळणकर यांनी केले सूत्रसंचालन संतोष राऊत तर आभार सुहास अंबाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात रेल्वे विकासाची नवी पहाट

## खासदार धानोरकर यांच्या प्रयत्नांना यश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, चंद्रपूर :** खासदार प्रतिभा धानोरकर या चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे दिसून येत आहे. खासदार धानोरकर यांनी निवडून आल्यानंतर १८ जुलै २०२४ रोजी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच महाप्रबंधक दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे यांना पत्र पाठवून गोंदिया-बल्लारशहा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाची मागणी केली होती. त्या मागणीला यश प्राप्त झाले असून दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत सदर मार्गाच्या दुहेरीकरणासाठी ४८१९ कोटी



रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वे समस्या संदर्भात वारंवार आढावा घेऊन चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील रेल्वे समस्या दूर करण्याच्या संदर्भात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती.

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वे चे जाळे मजबूत करण्यासंदर्भात त्यांनी आपले मत व्यक्त केले होते.

बल्लारशहा-गोंदिया रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी देखील रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वरील प्रकल्पासंदर्भात सकारात्मक असल्याचे आश्वासन दिले होते. खासदार धानोरकर यांच्या मागणीला यश आल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांसह गडचिरोली, भंडारा, गोंदिया येथील नागरिकांना देखील लाभ होणार आहे. या संदर्भात खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्र सरकार व रेल्वे मंत्री यांचे आभार मानले आहे.